प्रकरण चौथे

# ‘जोहड’ चे रचनाविशेष

प्रास्ताविक

१. निवेदन पद्धती

२. ‘जोहड’ मधील निवेदन

३. ‘जोहड’ मधील वातावरण

४. ‘जोहड’ मधील संवाद

५. ‘जोहड’ ची भाषा

६. हिंदी, राजस्थानी, इंग्रजी भाषेचा वापर

७. ‘जोहड’ मध्ये छोट्या छोट्या वाक्यांचा वापर

८. उपमा, म्हणी व वाक्प्रचारांचा वापर

९. गीतांचा वापर

१०. लोककथांचा वापर

समारोप

संदर्भ

प्रकरण चौथे

# 'जोहड'चे रचनाविशेष

## प्रास्ताविक

सुरेखा शहा यांच्या 'जोहड' या कादंबरीच्या रचनाविशेषचा विचार करत असता ही कादंबरी आशयाच्या दृष्टीने जशी वेगळी आहे त्याचबरोबर ती अभिव्यक्तिच्या दृष्टीनेही वेगळी वाटते. 'जोहड' ही कादंबरी मूलत: चरित-कादंबरी असली तरी लेखिका या कादंबरीला कुठेही चरित्रपर कादंबरीचे स्वरूप येऊ देत नाही. ही कादंबरी पूर्णत: वास्तवावर आधारलेली आहे. त्यामुळे येथे वेगळ्या विश्वाचे दर्शन घडलेले दिसते. या कादंबरीची निवेदनशैली, वातावरण, प्रसंग, संवाद, भाषा, उपमा, लोकगीते, लोककथा या सर्व घटकांचा विचार आपल्याला या प्रकरणात करावयाचा आहे.

या कादंबरीमध्ये अलंकाराचा फारसा वापर सुरेखा शहांनी केलेला दिसत नाही. ग्रामीण जीवनाचे अवलोकन करून लेखन केले आहे. 'जोहड'चे लेखन हे समजण्यास सोपे, सरळ व तेवढेच रसाळही आहे. अर्थवाही शब्दयोजनेचा वापर केला आहे. सुरेखा शहांची वर्णनशैली ही सुईमागून दोरा यावा इतक्या सहजपणे अर्थ उलगडत नेणारी आहे. साक्षात चित्र समोर उभे रहावे अशी चित्रमय वर्णन करण्याची त्यांची हातोटी आहे. त्यामध्ये प्रसंगानुसार बोलली जाणारी हिंदी, राजस्थानी भाषा आहे. वाङ्मयीन मूल्यांना भेदून जाणारी ही कादंबरी आहे. या कादंबरीविषयी डॉ. फडकुले म्हणतात, ''मराठी कादंबरीचा कस व कक्षा वाढविणारी 'जोहड' ही कादंबरी आहे. ही कादंबरी कादंबरीच्या सांकेतिक कल्पनांना छेद देते. कादंबरीतील जीवनाचे दर्शन वास्तव आहे. अशी कादंबरी मराठीत क्वचितच निर्माण झाली असेल.''[१] ही कादंबरी वास्तवाशी निगडित असल्याने वाचकांच्या मनावर बिंबते.

'जोहड' ही राजेंद्रसिंहांच्या कार्याची, कर्तृत्वाची गाथा असून, सुरेखा शहांना या कादंबरीद्वारे वेगळाच विषय मांडल्याचे समाधान होते. ही कादंबरी आवडल्यामुळे अनेक परिचित अपरिचित व्यक्तिकडून अभिनंदनाचा वर्षाव झाला. या कादंबरीमुळे अनेकांना प्रोत्साहन व प्रेरणा मिळाली. वास्तवाच्या भक्कम आधारावर ही कादंबरी सुरेखा शहांनी उभी

केली आहे. या कादंबरीमध्ये पाणी प्रश्नाबरोबर इतरही प्रश्न गुंफले आहेत. 'जोहड' हा नेमका काय प्रकार आहे याबाबत अत्यंत शास्त्रीय माहिती वाचकांना मिळते. सुनीता म्हणतात, ''सुरेखा शहा द्वारा लिखी गई राजेन्द्र सिंह की यह औपन्यासिक जीवनी उन लोगों के लिए एक मिसाल है जो आम लोगों के लिए, उन्हीं के बींच जा कर काम करना चाहते हैं।''[२] ही कादंबरी वाचल्याने समाजातील प्रश्न सोडवण्याची, समाजासाठी काहीतरी करण्याची इच्छा वाचकांमध्ये जागृत होते.

''कादंबरीमध्ये राजेंद्रसिंह यांच्या जीवनातील सूत्र पकडण्याचा प्रयत्न केला आहे. हे लेखकाचे कादंबरीतील आंदोलन आहे. न्यायालयीन स्वरूपाच्या किती तरी लढाया राजेंद्रसिंह यांनी केल्या. निराशा, उद्विग्नता काय असते हे कादंबरी वाचताना लक्षात येते. 'जोहड' ने आरोग्य, प्रगती, विकास, निसर्ग ओरबाडणे म्हणजे काय याविषयीचे अनेक प्रश्न निर्माण केले आहेत. धर्मशास्त्र, श्रद्धा, विज्ञान, समाजशास्त्र, संघटनेच्या विकासाच्या संदर्भातही कादंबरी काम करते.[३]'' असे आपले मत अनंत दीक्षित यांनी 'जोहड'च्या प्रकाशनावेळी व्यक्त केले. राजेंद्रसिंहांच्या नाट्यमय आयुष्याचा चित्रपट सुरेखा शहांनी उभा केला आहे. राजेंद्रसिंह राजेंद्रसिंहांच्या प्रयत्नांची ही कहाणी असली तरी तिच्या केंद्रस्थानी त्यांच्याबरोबरच राजस्थानमधील पाण्याविना तडफडणारी गावं व त्याचे प्रश्न आले आहेत. ते प्रश्न सोडवण्याचा त्यांनी केलेला आटोकाट प्रयत्न 'जोहड' या कादंबरीत चित्रित झाला आहे. याविषयी विद्युलता शहा म्हणतात, ''जोहड' कादंबरीत सेवाभावी जीवनाचे प्रतिबिंब उमटले आहे. लेखनाचा विषय उदात्त, उद्‌बोधक व दिशा देणारा आहे. ''[४] ही कादंबरी कोणत्याही एका दिशेला झुकलेली दिसत नाही हे या कादंबरीचे वैशिष्ट्य म्हणता येईल. हे एका वास्तवाचे दर्शन आहे. सुरेखा शहा स्वत: आपल्या कादंबरीविषयी म्हणतात, ''जोहड'चे लेखन करत असताना एवढे यश मिळेल याची कल्पना नव्हती. परंतु एक दर्जेदार कादंबरी लिहित आहे याची जाणीव मात्र सातत्याने होत आहे. ''[५] ही सर्व 'जोहड'मधील आशयाबाबतची मते लक्षात घेतल्यानंतर या कादंबरीच्या रचनेकडेही लक्ष देता येते.

प्रथम 'जोहड'मधील निवेदन पद्धतीचा विचार करून नंतर इतर घटकांचा अभ्यास करता येईल.

**निवेदन पद्धती :**

कादंबरीकार आपले अनुभव शब्दांत प्रकट करण्यासाठी कधी प्रथमपुरुषी निवेदनाचा वापर करतो तर कधी तृतीयपुरुषी निवेदनाचा वापर करतो. कादंबरीच्या निवेदनातून कादंबरीचे रुप आकारास येते. निवेदन हे कथानकातील सर्व घटना, प्रसंग यांना धरुन येते. कथानक, वर्णन, भाषा आणि संवाद या चार घटकांमधून कादंबरी आकार घेताना दिसते. त्याचप्रमाणे पात्रांच्या मनातील भावभावनांचे, विचारांचे दर्शनही घडविता येते. निवेदनातून घटनाप्रसंग, प्रसंगचित्रण, पात्रचित्रण, वातावरण निर्मिती या सर्व घटकांना जोडण्याचे काम होत असते. कादंबरीतील निवेदनातून अनेक घटनांचा अर्थ वाचकांसमोर स्पष्ट केला जातो. 'निवेदन म्हणजे घटनांची मालिका.'[६] प्रथमपुरुषी व तृतीयपुरुषी असे निवेदनाचे दोन भाग पडतात. प्रथमपुरुषी निवेदन हे पात्रमुखी निवेदन असते. म्हणजेच लेखक स्वत: कलाकृतीशी एकरुप होऊन निवेदन करत असतो. स्वत: कलाकृतीतील एकापात्राची भूमिका लेखकाने घेतलेली असते. तो स्वत: एक पात्र बनून कादंबरीत वावरत असतो. रोजनिशी अथवा पत्रे यामध्ये प्रथमपुरुषी निवेदन पद्धतीचा अवलंब केला जातो. तृतीयपुरुषी निवेदनात अलिप्त राहून तटस्थपणे निवेदन केलेले असते. बाहेरचे एखादे पात्र घेऊन निवेदन केले जाते. तृतीयपुरुषी निवेदनात लेखकाची भूमिका एखाद्या सर्वज्ञासारखी असते. याचा विचार करून सुरेखा शहांनी आपल्या कादंबरीमध्ये कोणत्या निवेदन पद्धतीचा कशाप्रकारे वापर 'जोहड'मध्ये केला आहे. याचा विचार पुढीलप्रमाणे करता येईल.

**'जोहड'मधील निवेदन :**

सुरेखा शहा यांच्या 'जोहड' या कादंबरीत तृतीयपुरुषी निवेदनाचा वापर केलेला आहे. या कादंबरीत राजेंद्रसिंहांच्या जीवनातील कर्तृत्वाचे, संघर्षाचे चित्रण वास्तववादी व प्रत्ययकारी केलेले दिसते. खाण कामगार, बेकायदेशीर शिकार, वृक्षतोड, प्राण्यांचे संरक्षण, पाणीप्रश्नाची यशस्वी सोडवणूक असे अनेक प्रश्न राजेंद्रसिंह कशाप्रकारे सोडवतात याचे वर्णन करताना सुरेखा शहांनी अर्थपूर्ण भाषाशैली वापरून निवेदन प्रभावी करण्याचा प्रयत्न केला आहे.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

'जोहड'मध्ये राजस्थानमधील आदिवासी लोकांच्या जीवनाचे प्रत्ययकारी चित्रण आले आहे. आदिवासी भागातील निसर्गाचे, पर्वताचे, जंगलाचे, तेथील लोकांच्या पेहराव्याचे, दागदागिन्यांचे व रंगरूपाचे साजेलसे चित्रण निवेदनातून केलेले दिसते. तसेच या लोकांच्या जीवनात येणारी दु:खं, दारिद्र्य, दैन्य, उपेक्षा, संघर्ष, अस्थिरता या सर्व समस्यांना त्यांनी कसे तोंड दिले हे निवेदनातून परिणामकारकरित्या चित्रित झालेले दिसते.

या कादंबरीचे निवेदन वास्तववादी आहे. काल्पनिक अथवा पाल्हाळीक नाही. वर्णनात निवेदन अडकत नाही. आशयाला महत्त्व मिळते. म्हणी, उपमा, वाक्प्रचार यांचा वापर करून निवेदनाला धारदारपणा आणला आहे.

'जोहड' या चरित कादंबरीत राजेंद्रसिंहांच्या कार्याचा आलेख चित्रित केला आहे. इतरांसाठी काहीतरी करण्याचे राजेंद्रसिंहांचे स्वप्न होते. इतरांना साह्य करण्याची प्रचंड उर्मी होती. या उर्मीतूनच ते स्वत: एकटे, कुणीही साह्याला नसताना, जोहड खणण्याचा निर्णय घेतात. तेथील पाण्यासाठी तडफडणाऱ्या माणसांना पाण्याची सोय करून देण्याच्या हेतूने प्रथम जोहड खणण्यास एकटे सुरुवात करतात. याविषयी पुढील निवेदन येते, '... घामाच्या धारेनं भूमातेचा अभिषेक होत होता. श्रमाने तिची पूजा बांधली जात होती. ध्येयासक्तीनं कष्ट जाणवत नव्हते... पुरुषार्थाच्या किमयेनं उन्हाचं चांदणं होत होतं. कुदळीचा एकेक घाव धरतीवर एक नवा इतिहास कोरीत होता... हळूहळू भुईतून बांध वरती डोकावू लागला...'[७] त्यांच्या मदतीला कोणीही नव्हते. तरीदेखील कोणावर त्यांचा राग नव्हता. या महान पुरुषाच्या कार्याचे अत्यंत समर्पक असे निवेदन लेखिकेने केलेले आहे.

जन्मल्यानंतर प्रत्येकजण जीवन जगत असतो. परंतु काहींचे जीवन चांगले काम करून सार्थकी लागते तर काहींचे जीवन वाईट कामे करून निरर्थक बनते. पण कोणीही जगणे सोडत नाही. 'आपण कोण ?... आपण एखाद्या पावसाच्या थेंबासारखे, तो शेतात पडला तर पीक येईल, सागरात पडला तर खारट होऊन जाईल, सर्पाच्या तोंडी पडला तर विष होईल आणि स्वातीनक्षत्रात एखाद्या उघड्या शिंपल्यात पडला तर त्या थेंबाचा मोती होईल. आपलं जीवनही असेच नाही का? कुणाचे व्यर्थ जाईल, कुणाचे उपभोगात जाईल, तर कुणाचे ध्येय प्राप्तीसाठी कारणी लागेल...'[८] प्रत्येक व्यक्तीचे जन्मणे एकसारखेच पण तो

आपले जीवन कोणत्या कामाला अर्पण करेल हे मात्र भिन्न असते. माणूस एकच पण त्याच्या या अवस्था, जगण्याच्या पद्धती मात्र भिन्न असतात. सुरेखा शहांच्या वरील निवेदनातून कादंबरी आकार घेताना दिसते. अशा निवेदनातून जीवन जगण्याच्या पद्धतीचे सूत्र लक्षात येते.

सुरेखा शहा आपल्या निवेदनातून राजेंद्रसिंहांचे विचार मांडतात. आश्रमाच्या अंगणातील खाटेवर राजेंद्रसिंह पडले असताना त्यांना झोप लागत नाही. त्यांच्या मनात विचार येतो. '... हे आकाशाचे विशाल छत्र, सारं विश्वच त्यात सामावलेलं. या अंतहीन छताखाली आपल्यासारखी असंख्य माणसे राहतात. सागरातल्या एखाद्या बिंदूसारखी नगण्य या विश्वातल्या पसाऱ्यात आपण कुठे आहोत? कसे आहोत? एखादा धुळीचा कण असावा तसे सूक्ष्म, सूक्ष्म...'[९] ब्रह्मांडाचे, अवकाशाचे, विश्वाचे असे निवेदन येते. विश्वाचे, आकाशाचे मानवाशी असणारे नाते आपल्या निवेदनातून लेखिका सांगतात.

राजस्थानमधील आदिवासी लोकांना खाणीच्या कामामुळे अनेक रोगांना सामोरे जावे लागत होते. त्यांची भयानक स्थिती पाहून राजेंद्रसिंहांचे मन अस्वस्थ होते. ते त्या लोकांना खाणीच्या कामावर जाण्यास मनाई करतात. राजेंद्रसिंह अनेकांना जोहड खणण्यास प्रवृत्त करतात. शेतातील श्रमाची माहिती सांगतात. त्यामुळे, '...त्यांच्या दु:खाला, भयाला, वेदनेला वाचा फुटली होती. होरपळलेल्या जीवावर फुंकर घातली गेली होती...'[१०] या निवेदनातून राजेंद्रसिंहांचे व्यक्तिमत्त्व साकार होत जाते. 'या भूमीला आपल्या श्रमाचे, घामाचे खतपाणी घातले तर ती प्रसन्न होईल. पुन्हा एकदा ती प्राणदायिनी, वरदायिनी होईल. हिरवाईने श्रीमंत होईल आणि आपल्यालाही श्रीमंत करील.'[११] हे निवेदन भविष्यात मिळणाऱ्या फळाचे स्वप्न उभे करते.

राजेंद्रसिंहांचा बालमित्र गोपाल राजेंद्रसिंहांना सोडून जातो. त्याची आठवण त्यांना खूपदा येते. तो भेटेल याची खात्री नसते. 'काळाच्या अदृश्य वाटेवरती काही वर्षांची पावलं उमटून गेली. पुसटशी झाली. तेव्हा गेलेला गोपाल या दुनियेच्या बाजारात पुन्हा कधी भेटलाच नाही. ना त्याचा ठावठिकाणा माहीत ना कसली नावनिशाणी.'[१२] गोपालविषयीची

उत्कंठा निर्माण करणारे हे निवेदन दिसून येते. चौथ्या प्रकरणात गोपालच्या बालपणीच्या आठवणी व त्याच्या मृत्यूचा प्रसंग याचे लेखिका निवेदन करते.

'जोहड'मध्ये पुराने थैमान घातलेल्या अनेक गावाची नावे आलेली आहेत. त्याचबरोबर पुराच्या प्रसंगाचेही निवेदन येते. पूर आलेल्या गावांची नावे दिल्यामुळे त्या गावचे चित्र वाचकांच्या डोळ्यासमोर उभे राहते. '... बिरानी, निमलाको, जालाको, धोकाका, दाईका, शेरपूर, श्यालोदा, सालदार, मिर्जापूर, गुड रायपूर, झाडका, भगेरीकला, जमालपूर, गांगापुरी...'[१३] अशा अनेक गावांचा उल्लेख केला आहे.

जंगलातील औषधी वनस्पतींचे उपयोग व नावेही या कादंबरीमध्ये आलेली आहेत. 'पुनर्नवा, हुलहुल, दुग्धिका, खरेटी, कटेली, अर्जुन, गोखरू, शाल्मली, आत्मगुप्ता, शतावरी, शंखपुष्पी, ब्राह्मी, आवळा...'[१४] यासारख्या वनस्पतींची नावे व उपचार याचा कादंबरीत उल्लेख केल्याने वाचकाला माहिती मिळते व निवेदन किती सूक्ष्म आहे याचा प्रत्यय येतो. त्यामुळे कादंबरी वाचनीय बनून तिचे वेगळे रूप समोर येते. त्यामुळे 'जोहड'च्या निवेदनाबाबत दीपक घारे म्हणतात, ''कादंबरी म्हणजे पुस्तकाला मर्यादा पडत असल्या तरी प्रांजळ निवेदनामुळे ते अतिशय वाचनीय झाले आहे. शिवाय कादंबरी आणि रिपोर्टाज यांच्यामधला ललित गद्य हा एक वेगळा आविष्कार म्हणून त्याकडे बघता येईल...''[१५]

कादंबरीत दुसऱ्या व चौथ्या प्रकरणात पूर्वघटित चित्रण केलेले दिसते. गतकालीन घटना-प्रसंगाचे चित्रण आले आहे. राजेंद्रसिंहांचे बालपण, गोपालबरोबर घालवलेले दिवस, कॉलेज जीवन याचा वृत्तांत आलेला आहे. शेवटच्या प्रकरणात राजेंद्रसिंह स्वतःच्या आयुष्याकडे बघताना दिसतात. त्यामुळे याला आत्मचिंतनाची जोड मिळालेली दिसते.

अशाप्रकारे सुरेखा शहा यांनी तृतीयपुरुषी निवेदन पद्धतीचा अवलंब केला आहे. राजेंद्रसिंहांच्या व इतर पात्रांच्या मनातील भाव-भावना निवेदनातून अधिक स्पष्ट होतात. काही ठिकाणी राजेंद्रसिंहांच्या अंतर्मनाचे चित्रण केलेले जाणवते. या कादंबरीला आत्मचिंतनाचीही जोड मिळाली आहे. या कादंबरीचे निवेदन ओढून ताणून केलेले दिसत नाही. ते कादंबरीचा अविभाज्य भाग म्हणून येते. निवेदनात गुंतागुंत आढळत नाही. ते

अधिक स्पष्ट, तटस्थ राहून अलिप्तपणे केलेले दिसते. अशा प्रभावी निवेदनशैलीमुळे या कादंबरीचा वाचकांच्या मनावर ठसा उमटतो.

**'जोहड'मधील वातावरण :**

कादंबरीतील वातावरण निर्मितीमागे कलावंताची वेगळी दृष्टी असल्यामुळे हेतूनुरुप वातावरणाची निर्मिती झालेली असते. वातावरण हाही घटक इतर घटकाप्रमाणेच कादंबरीत महत्त्वाचा असतो. लेखक वातावरण निर्माण करून प्रसंग, पात्र, तेथील निसर्ग आपल्या डोळ्यांसमोर उभा करतो. ''स्थलकालवैशिष्ट्याचे कादंबरीत पडलेले प्रतिबिंब म्हणजेच हे वातावरण होय.''[१६] असे मत प्र. वा. बापट व ना. वा. गोडबोले यांनी व्यक्त केले आहे. या वातावरणातून स्थल, काल प्रकट होत असतो. कथानकाच्या वाढीसाठी वातावरणाची आवश्यकता असते. कादंबरीत सामाजिक, नैसर्गिक वातावरण आलेले असते. प्रसंग व व्यक्तिदर्शन प्रभावशाली होण्यासाठी लेखकाला विशिष्ट प्रकारची वातावरण निर्मिती करावी लागते. एखादा घटक जसाच्या तसा उभा करण्याचे सामर्थ्य वातावरणामध्ये असते.

'जोहड' या कादंबरीत राजस्थानमधील आदिवासी भागातील वातावरण पहावयास मिळते. आदिवासी भागातील लोक, त्यांची अवस्था, त्यांचे दुःख, दारिद्र्य, दैन्य हे या कादंबरीतील वातावरणातून पहावयास मिळते. भौगोलिक पार्श्वभूमी चित्रित करण्याकडे सुरेखा शहांनी विशेष लक्ष दिलेले जाणवते. 'जोहड'च्या वातावरणनिर्मितीमुळे परिणामकारकता साधलेली दिसते.

'जोहड' या कादंबरीचा आस्वाद घेत असताना तिच्यातील वातावरणनिर्मितीमुळे आपण गुंतत जातो. या कादंबरीमधील वातावणनिर्मिती वाचकाला गुंतवून ठेवणारी आहे. या कादंबरीत दुष्काळाचे वातावरण येते. त्या परिसरातील बारकावेही जसेच्या तसे जिवंत होतात. हे वातावरण पुढीलप्रमाणे दिसते. 'तेथील गावागावावर निसर्गाची झालेली अवकृपा, निष्क्रिय झालेली माणसं, लहान खेड्यांची, वस्त्यावस्त्यातून झालेली वाताहत. तिथल्या तरूणांनी रोजीरोटीसाठी शहराकडे घेतलेली धाव, आटलेल्या नद्या, विहिरी, नजर पोहोचेल तिथवर दिसणारी भेसूर बंजर जमीन आणि त्याहीपेक्षा अधिक बंजर झालेली तिथल्या रहिवाशांची मनं!'[१७] सुरेखा शहांनी राजस्थानमधील दुष्काळी भागाचे वातावरण चित्रित

करण्यासाठी वापरलेली भाषा या भाषेचे व वातावरणाचे नाते अतूट असलेले दिसते. दुष्काळी भागातील लोकांची, तेथील परिसराची, आजूबाजूच्या वाड्यावस्त्यांची पाण्याअभावी झालेली वाताहत या वातावरणातून दिसून येते.

राजेंद्रसिंह व त्यांचे मित्र सामाजिक कार्य करण्याच्या हेतूने प्रथम किशोरी या गावात प्रवेश करतात. त्यावेळी ग्रामीण भागातील अंधाऱ्या रात्रीचे वातावरण सुरेखा शहांनी चित्रित केलेले दिसते. 'रात्र भराला आली होती. चंद्र ढगानं झाकून गेलेला. गावात सगळीकडे सामसूम झाली होती. कुठेही एखादा दिवा दिसत नव्हता की हालचाल. जणू काही अंधाराचं पांघरूण घेऊन ते गाव झोपी गेलं होतं. पुढे निघालेल्या गावच्या माणसांच्या मागून अंधारात चाचपडत ते परगावचे पाची जण निघाले. सत्येंद्रच्या हातात टॉर्च होता; परंतु त्यातला प्रकाश नावापुरताच होता.'[१८] अशा वातावरणात राहणारे तेथील आदिवासी लोक. तिथे कोणत्याही योजना पोहोचलेल्या नसल्यामुळे विजेची सोयही नसते. अशाप्रकारे रात्रीचे वातावरण शब्दबद्ध झाले आहे.

राजेंद्रसिंह व त्यांचे मित्र समाजकार्य करण्याच्या उद्देशाने आले होते. ते आजूबाजूचे वातावरण पाहून विचार करू लागतात. कामाला कुठून सुरुवात करावी हे त्यांना कळत नव्हते. त्या रात्रीच्या वेळच्या वातावरणाचे चित्रण कादंबरीत पुढीलप्रमाणे येते. 'समोरच्या रानावर अष्टमीच्या चंद्राचा मंद प्रकाश पसरलेला. जणू भानामतीने ग्रासलेल्या प्रदेशासारखा तो परिसर त्या क्षणी भासू लागला. काही क्षण स्तब्धतेने बुडून गेले. विचार करण्यात मन गुंतले होते. त्यामुळे सारंच काही मौन झालेलं. या पाचजणांप्रमाणेच बाहेरचे वातावरणही नि:शब्द. ना झाडांची सळसळ ना कसलाही आवाज.'[१९] अशा या अष्टमीच्या रात्रीत विचारात गुंग असलेल्या मानवी मनाचे चित्रण आले आहे. सामाजिक परिस्थितीचा प्रभाव त्यांच्या मन:पटलावर पडलेला दिसून येतो. त्या विचारात ते बुडून गेलेले दिसतात.

सुरेखा शहांनी पाण्यापासून अलिप्त असणाऱ्या व प्रेतवत भासणाऱ्या राजस्थानमधील भागाचे वातावरण पुढीलप्रमाणे व्यक्त केले आहे. 'कुठेही चैतन्याची सळसळ नाही, जीवनसंगीताची धून नाही, जिवंतपणाची खूण नाही, ओढ्यांची खळखळ नाही, पाण्याच्या ओलाव्याची निशाणी नाही, हिरवाईचं पांघरुण नाही की समृद्धीचं अस्तित्व

नाही...'[२०] या वातावरणामुळे ग्रामीण भागाची स्थिती लक्षात येते. निराशा पसरलेली पहावयास मिळते. पाणी नसल्याने हिरवाई नाही, हिरवाई नसल्याने समृद्धी नाही, समृद्धी नसल्याने माणूस आनंदी नाही. पाण्याच्या अभावानेच सर्व काही प्रेतवत भासत आहे. कशातही जिवंतपणा नाही, अशा वातावरणाचे वास्तववादी चित्रण 'जोहड'मध्ये आले आहे.

तप्त अशा दुपारच्या वातावरणाचे वर्णनही सुरेखा शहांनी केले आहे. 'तापलेले भणाणणारे वारे, उघड्या, बोडक्या डोंगरातून जाणारी पायाखालची बिकट वाट, वाळूचे थर, जाता जाता सूड घेतल्यासारखी अंग ओरबाडणारी काटेरी झुडपं, माथ्यावर रागावलेला सूर्य, नजरेच्या आसपास कुठेही हिरवाई नाही. नुसती काटेरी झुडपं...'[२१] अशा आग ओकणाऱ्या वातावरणातही आदिवासी हतबल न होता राहतात. अशा पाण्याविना अतृप्त राहिलेल्या धरतीचे वर्णन येते. अस्थिर असे मानवी जीवन या कादंबरीतून सूचित झालेले दिसते.

याशिवाय जोधपूरच्या महाराजाच्या वाढदिवसाचे आनंदी वातावरणही उल्लेखण्यासारखे आहे. वाळवंट असूनही काही ठिकाणी निसर्ग वैभवाने नटलेल्या, राजस्थानचे वातावरण, दुष्काळामुळे गावागावातून पसरलेली अवकळा-मरणकळाचे वातावरण पाणीटंचाईपासून मुक्त झाल्याने, हातात पैसा आल्याने समृद्ध झालेले सामाजिक वातावरण, राजेंद्रसिंहांचे व त्यांच्या घरातील मीना, रेणू, मौलिक याचे निर्माण झालेले कौटुंबिक वातावरण या कादंबरीत चित्रित झाले आहे.

**'जोहड'मधील प्रसंगचित्रण :**

प्रसंगचित्रणाशिवाय कादंबरीची संकल्पना निरर्थक ठरते. सपाट जीवनचित्रणाने कादंबरी प्रभावी होत नाही. लहान-मोठ्या प्रसंगांनीच कादंबरी रंजक आणि वाचनीय बनते. प्रसंग आणि स्वभावरेखन यांच्यातील भेद म्हणजे, ''स्वभावरेखन मनुष्याचे गुणधर्म दाखविते, पण प्रसंगांनीच मनावर चांगला आघात होतो.''[२२]

कादंबरीला गती येण्यासाठी वाचकाच्या मनात कुतुहल निर्माण करण्यासाठी कादंबरीकार एका प्रसंगातून दुसरा प्रसंग निर्माण करत असतो. 'कादंबरीतील निरनिराळे प्रसंग हे साखळीतील दुव्यासारखे परस्परांशी निगडित असे असतात.'[२३] हा दुवा जर साधला गेला नाही तर कादंबरीला विस्कळीतपणा येण्याची शक्यता असते.

सुरेखा शहांच्या 'जोहड' या कादंबरीमधील एक प्रसंग वाचला की दुसरा प्रसंग वाचण्याची उत्कटता निर्माण होते. त्यामुळे वाचकांचे लक्ष त्या त्या प्रसंगाकडे खेचले जाते. 'जोहड' या कादंबरीत अनेक प्रसंगांची साखळी आहे. या कादंबरीमध्ये कालानुक्रम प्रसंगाचे कथन केलेले नाही तर कार्यकारणभाव सूचित केला आहे. त्यामुळे कुतूहल निर्माण होते. महत्त्वाच्या प्रसंगांना केंद्रस्थानी ठेवून वाचकाचे लक्ष केंद्रित केले आहे. प्रसंगामुळेच ही कादंबरी वाचनीय बनली आहे. ''वेगळा विषय, ओघवती लेखन शैली आणि ज्यांच्या जीवनावर 'जोहड' लिहिली त्या राजेंद्रसिंह यांच्या जीवनातील भरपूर नाट्यमय प्रसंग. यामुळे 'जोहड' ही चरित्र कादंबरी मनोरंजक व वेधक झाली.''[२४] असे सुरेखा 'जोहड'विषयी आपल्या मुलाखतीत सांगतात. माणूस हा जन्मत:च श्रेष्ठ नसून अनेक प्रसंगांशी संघर्ष करून श्रेष्ठ कसा ठरतो ते सुरेखा शहांनी राजेंद्रसिंहांच्या माध्यमातून दाखविले आहे. हे घटनाप्रसंग ग्रामीण जीवनानुभवांचे प्रत्यंतर देतात. या घटनाप्रसंगातून वास्तवता प्रकट झाली आहे. आदिवासी लोकांच्या व्यथा, वेदना त्यांच्यावर ओढावले गेलेले काही प्रसंग वैयक्तिक पातळीवरचे आहेत तर कांही सामुहिक पातळीवरचे आहेत.

सामाजिक सुधारणा घडवून आणण्याची राजेंद्रसिंहांना ज्यांच्यापासून प्रेरणा मिळाली तो राजेंद्रसिंहांचा लहानपणापासूनचा मित्र गोपाल. गोपालचे कुटुंब काही कारणास्तव गाव सोडून जाण्याचा निर्णय घेते. राजेंद्रसिंहांना गोपाल आपल्याला सोडून जाणार याचे फार वाईट वाटते. परंतु काही काळ लोटल्यानंतर बऱ्याच वर्षांनी दोघांची भेट होते. दोघांनाही खूप आनंद होतो. परंतु हा आनंद फार काळ टिकत नाही. गोपाळचा कॅन्सरने मृत्यू होतो. त्यामुळे अस्वस्थ झालेले राजेंद्रसिंह यावेळचा प्रसंग लेखिकेने समरसून चित्रित केलेला जाणवतो.

'जोहड'मधील लोकांना कधी दुष्काळाला सामोरे जावे लागते तर कधी महाभयानक अशा महापुराला सामोरे जावे लागते. याविषयीचा प्रसंग लेखिका चित्रित करते. 'काल पहाटे सारे गाव गाढ झोपेत असताना रुपारेल नदी खवळली. सारी बंधनं तोडून देऊन क्रूद्ध होऊन ती घरादारांचा, माणसांचा घास घेण्यासाठी गावात घुसली. बेभाणपणे नागिणीसारखी फुसफुसू लागली. जणू काही तिला बदला घ्यायचा होता. पुराचं पाणी गावात, घरादारात शिरताच आक्रोश सुरू झाला. जीव वाचविण्यासाठी धडपड सुरू झाली. काहींनी उंचावर

सुरक्षित ठिकाणी आश्रय घेतला. काहींना तेवढीही फुरसत मिळाली नाही. पुराच्या पाण्याने त्यांना ओढून नेले. ज्यांना पोहायला येत होते असे काही जण कसेबसे वाचले.'[२५] या प्रसंगामुळे जीवितहानी मोठ्या प्रमाणात झाली. या जीवघेण्या महापुराच्या प्रसंगातून गावकऱ्यांना राजेंद्रसिंहांनी व त्याच्या साथीदारांनी वाचवले. स्वतःच्या जिवाची पर्वा न करता मदत केली. या महापुराच्या परिस्थितीत आणखी एक प्रसंग घडतो. 'राजेंद्रांनी पाहिले, पुराच्या पाण्यातून एक पाळणा वाहत त्यांच्या दिशेने येत होता. त्यात पाच-सहा महिन्याचं बाळ होतं. पाळणा पाण्यावर अद्यापि तरंगत होता; पण कुठल्याही क्षणी त्या चक्रावत येणाऱ्या, रोरावणाऱ्या लालसर पाण्यानं त्या इवल्याशा बाळाचा घास घेतला असता. राजेंद्रांनी पुढे झेप घेतली आणि त्या पाळण्याचा दांडा पकडला. त्यांच्या मागे असलेल्या श्रवणने त्या बाळाला क्षणात उचलून खांद्यावर घेतलं. या हिसकाहिसकीत आणि थंडगार पाण्याच्या स्पर्शाने आता ते बाळ आकांतानं आक्रोश करू लागलं. पण राजेंद्रसिंहांच्या ओठावर तशा अवस्थेतही स्मित उमटलं. कारण त्या आईच्या बाळाला त्यांनी वाचवलं होतं. बाळाला खांद्यावर उंच पकडून श्रवण कसाबसा पाण्याबाहेर आला. तिथल्या कार्यकर्त्यांनी बाळाला उचलून घेतलं. काही वेळानं बाळाची आई तराफ्यावरून तिथे आली तेव्हा आपल्या बाळाला आसासून जवळ घेताना तिच्या आनंदाश्रूंना भरती आली.'[२६] अशी प्रसंगचित्रण 'जोहड'मध्ये येतात. त्यातून लेखिका मानवाचे संघर्ष, अस्तित्वाचा लढा मांडताना दिसते.

मीण, गुर्जर, बढाई या आदिवाशांना खाणीच्या कामामुळे अनेक आजारांना सामोरे जावे लागते. अनेकांचे या आजारात प्राणही गेले होते. म्हणून राजेंद्रसिंह खाणी बंद पाडण्याचा निर्णय घेतात. गावकरीही त्यांना साह्य करतात. यामुळे खाण मालकांची पैशांची आवक कमी होते. त्यामुळे खाणमालक राजेंद्रसिंहांवर प्राणघातक हल्ल्याचा कट रचतात. तो प्रसंग लेखिकेने पुढीलप्रमाणे चित्रित केला आहे. '... राजेंद्र कलेक्टरच्या ॲम्बेसडरमध्ये जाऊन बसले. ड्रायव्हर शेजारी एक पोलीस आणि त्यांच्या शेजारच्या सीटवर एक पोलीस बसला. ती लाल दिव्याची गाडी सुरु झाली. पुढे न्यायाधीशांची गाडी चालली होती. गाडी चौकातून वळली तोंच शेजारी बसलेल्या पोलिसाने राजेंद्रसिंहांना सीटवरून खाली ढकलले.

त्याच क्षणी गोळीबाराची फैर झडली. राजेंद्रांना पाठलाग करीत खाणमालकांचे भाडोत्री मारेकरी इथपर्यंत आले होते. दक्ष पोलिसाचे लक्ष त्यांच्याकडे वेधले आणि त्याने राजेंद्रांना वाचवले.'[२७] राजेंद्रसिंहांविषयी चांगला विचार करणारे होते त्याचप्रमाणे त्यांचे शत्रूही निर्माण झाले होते. पण त्यांच्या पाठीशी अनेक चांगल्या विचारांचे लोकही होते.

याचप्रमाणे आणखी एक प्राणघातक हल्ला त्यांच्यावर, झाला. 'समोरच त्यांना हरिचरण, प्रभातीराम दिसले. त्यांच्या दिशेने ते पुढे आले. तेवढ्यात त्या वनवासी मजूरांपैकी काही जणांना अचानक दिसले की, हातात काठ्या, तलवारी घेऊन काही गुंडे राजेंद्र भैय्यांच्या दिशेने येताहेत. ते हल्ला करणार तेवढ्यात सरिस्कातल्या त्या आदिवासींनी प्रसंगाचे गांभीर्य ओळखून क्षणार्धात राजेंद्र भैय्यांभोवती वेढा घातला. आपल्या देहाची ढाल त्यांनी आपल्या प्राणप्रिय भैय्यासाठी केली. स्वत:च्या प्राणाची पर्वा न करता गुंडांनी हल्ला केला. काही लोकांना मार बसला. तरीही राजेंद्रांच्या हातावर तलवारीचा निसटता वार झाला. तोपर्यंत या परिस्थितीचा अंदाज सर्वांना आला. सारे त्या भाडोत्री गुंडांवर तुटून पडले...'[२८] हा जनकल्याण करणारा महापुरुष प्राणघातक हल्ला झाला तरीही शांत बसला नाही. आपल्या जिवाची पर्वा न करता सामाजिक कार्य करत राहिला, लोकांना मार्गदर्शन करत राहिला.

वाघासारख्या हिंस्त्र प्राण्याच्या तावडीतून झालेली जयरामची सुटका, त्याच्या जिवावर बेतलेला एक प्रसंग पुढीलप्रमाणे - 'पण समोरचं दृश्य पाहून अचानक त्यांचे पाय थांबले. क्षणभर त्याचा श्वासोश्वास थांबला. जयराम एखाद्या पुतळ्यासारखा स्तब्ध उभा राहिला. त्याच्यापासून पंधरा-वीस हात अंतरावरच वाघरू उभं होतं. आपल्या मिशा जिभेने चाटत त्यानं जयरामकडे एक नजर टाकली. त्याचा पिवळा जर्द, हळदीसारखा रंग, त्यावर शोभिवंत दिसणारे काळे पट्टे, चपळ शरीर, ताणलेले शेपूट, त्याला पाहताच वाघाने आपले कान टवकारले, शेपूट उंचावले, झेप घेण्यासाठी पवित्रा घेतला.

जयरामच्या अंगाचं पाणी पाणी झालं. आपला काळ आलाय. याच्या तावडीतून आपण आता सुटूच शकत नाही, हे त्या क्षणी त्याला कळून चुकलं. त्यानं देवाचं नाव घ्यायला सुरुवात केली. हालचाल न करता तो एखाद्या वठलेल्या झाडासारखा उभा राहिला. वाघानं त्याच्याकडे तुच्छतेने पाहिल्यासारखं करून झेप घेतली आणि जयरामच्या पर्लाकडून

दोन हात अंतरावरून तो डावीकडच्या झाडीत दिसेनासा झाला.'[२९] या प्रसंगातून आदिवासी माणूस कशा अवस्थेत जगत होते हे समजून येते.

एकंदरीत ओघवती लेखनशैली आणि ज्यांच्या जीवनावर 'जोहड' लिहिली, ते राजेंद्रसिंह यांच्या जीवनातील भरपूर प्रसंग व इतरही प्रसंग येथे सुरेखा शहांनी चित्रित केले आहेत. या प्रसंगांमुळेच 'जोहड' ही कादंबरी मनोरंजक व वेधक झाली आहे. अशा प्रसंगांतून राजेंद्रसिंहांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू लेखिकेने संवेदनशीलतेने टिपलेले दिसतात.

**'जोहड'मधील संवाद :**

कादंबरीतील संवाद हा घटक मानवी मनाचे कंगोरे प्रभावीपणे आविष्कृत करणारा असतो. संवादाच्या सहाय्याने लेखक आपल्या कादंबरीतील पात्रांच्या मनोव्यापाराचे, सामाजिक संबंधाचे सहज सुलभतेने चित्रण करू शकतो. कादंबरीत चित्रित केलेल्या विशिष्ट समाजातील माणसांच्या मनात नेमके काय चालले आहे, त्यांचा स्वभाव, त्यांची जीवन जगण्याची पद्धती, त्यांचे विचार, त्यांच्या भावना हे सर्व लेखक संवादातून व्यक्त करत असतो.

घटना, प्रसंग आणि व्यक्ती यांना एकाचवेळी साकार करण्याची शक्ती संवादामध्ये असते. कादंबरीतील संवादावर बाह्यत: निर्बंध लादले जात नाहीत. कादंबरीतील अनुभूतीच्या अभिव्यक्तीसाठी सरळ निवेदनापेक्षा संवादाची योजना जिवंत आणि प्रत्ययकारी असते. कादंबरीत घटना अथवा प्रसंगानुसार संवाद येत असतो. संवादाच्या भाषेद्वारे बोलीभाषेची सर्व वैशिष्ट्ये, सामर्थ्य, स्थळे कादंबरीत स्वाभाविकपणेच प्रकटतात.

सुरेखा शहा यांची 'जोहड' ही कादंबरी सामाजिक प्रश्नांवर आधारित आहे. राजेंद्रसिंहांच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन येथे घडते. सुरेखा शहांनी व्यक्तिंच्या अनेक भावना शब्दात पकडल्या आहेत. त्यामुळे 'जोहड'मधील संवाद अर्थपूर्ण झाले आहेत. या कादंबरीतील संवाद स्वाभाविकपणे त्या त्या पात्रांच्या तोंडी आलेले आहेत. यातील पात्रे राजेंद्रसिंहांसारखी सुशिक्षित आहेत तशीच जयराम मीणा, मांगू पटेल यासारखी अशिक्षितही आहेत. स्वप्नरंजनात्मक, सोप्या, सुटसुटीत, मोजक्या वाक्यांतून दैनंदिन व्यवहारात सहज

बोलल्या जाणाऱ्या भाषेतून लेखिकेने व्यक्तींच्या स्वभावाचे दर्शन घडविलेले दिसते. कजौडी व जंबुरी यांच्या संभाषणातून राजेंद्रसिंहांविषयीचा गैरसमज दूर होऊन आपलेपणा निर्माण झालेला दिसून येतो.

''काय बाका प्रसंग आला होता बाई तुझ्यावर. त्या शहरवाल्या पोरांनीच वाचवलं बरं त्यांना ! नाहीतर रामीसारखीच तुझी गत झाली असती.'', जंबुरी म्हणाली.

''खरं आहे, पण त्यादिवशी आपण त्यांना काय समजलो होतो. केवढा अपमान केला त्यांचा. कुठं पाप फेडू मी हे. तिथे गोपालपुरला गेल्यावर दवापाण्याचा खर्चही त्यांनीच केला बघ. झालंच तर येतानाही त्यांनीच पोरांना कडेवर घेतलं होतं.''

''खरंच गं बाई, त्यांच्या रूपाने देवच भेटला म्हणायचा.''

''या बिमारीपासून कसं दूर राहायचं ते त्यांनी मला सांगितले आहे आणि इथल्या बायकांनाही समजावून सांगा म्हणाले. त्याप्रमाणे मी सर्वजणींना सांगतोय.''कजौडी म्हणाली.

''बरं केलंस बाई, आपण अडाणी, पण तेवढं तरी शहाणपण आलं म्हणायचं.''

''पण मौसी, ते कसे आहेत आणि आपण कसे? पाहा ना! काल मी जोहडकडे गेले होते. जळण आणायचं होतं म्हणून पलीकडं जायचं होतं. तिथे नवीन जोहड बांधताहेत ते एकटेच. त्यादिवशी ससुरजी न बाकीची पुरुष माणसं हनुमानजीच्या मंदिरात गेली होती.''[३०]
या संवादातून राजेंद्रसिंहाविषयी आरंभी लोक कोणता विचार करीत होते हे दिसून येते.

राजेंद्रसिंह नोकरीचा राजीनामा देऊन समाजकार्य करण्याचे ठरवतात. परंतु हे त्यांच्या पत्नीला मीनाला पटत नाही. ते आपल्या पत्नीला समजावून सांगतात तरीही ती नोकरी सोडायची नाही असा हट्ट धरते. परंतु राजेंद्रसिंहही आपल्या निर्णयावर ठाम असतात. कारण त्यांना नोकरी सोडल्याशिवाय समाजकार्य करण्यास पूर्ण वेळ देता येत नव्हता. हे मीनाला सांगताना साधला गेलेला संवाद पुढीलप्रमाणे पहाता येईल.

''... मी ठरवलंय की, या नोकरीचा राजीनामा द्यायचा आणि पूर्ण वेळ या लोकांसाठी द्यायचा...''

"हे तुम्ही काय म्हणताय? नोकरी सोडून कसं व्हायचं? असा विचार करू नका! आपलं घर, संसार कसा चाललेलं ?"

"तू मला समजून घे. आपला संसारही व्यवस्थित होईल. सुखोपभोग मिळणार नाहीत आपल्याला; पण सुख-शांती नक्की मिळेल."[३१] राजेंद्रसिंह नोकरी सोडण्याच्या निश्चयावर ठाम असतात. तर मीना माहेरी जाण्याचा निर्णय घेते. एकमेकांना समजून न घेतल्याने मतभेद निर्माण होतात. या संवादावरून असे लक्षात येते की मीनाचे विचार सर्वसामान्य स्त्री प्रमाणे आहेत. आपले कुटुंब आणि आपण एवढ्यापुरतेच मर्यादित आहेत. राजेंद्रसिंहांच्या विचारातून एका समाजशील, सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या समाजकल्याण करणाऱ्या कर्तृत्ववान महापुरुषाचे दर्शन घडते.

लिलुंडा मध्ये पाण्याची टंचाई असते तिथे राहणारी राहणारी दडकी जोहड बांधण्याचा निर्णय घेते. परंतु जोहडसाठी लागणाऱ्या खर्चातील चवथा हिस्सा गावकऱ्यांनी द्यायचा व कुणीही दारू प्यायची नाही या राजेंद्रसिंहांच्या अटी दडकी मान्य करते. हे गावकरी गावच्या हिश्श्याचे पैसे द्यायला तयार होत नाहीत तेव्हा दडकी सर्व पैसे स्वत: द्यायला तयार होत. गावकरी व दडकीमाई यांच्यातील संवादातून दिसून येते.

"आम्ही कसे देणार पैसे? आमच्याजवळ पैसे नाहीत. इथे तर शेतीच नाही. गुरं पाळून दुधाचा खवा तयार करतो. खालच्या गावातल्या बाजारात नेऊन विकतो. तेवढीच आमदानी, त्यातून पोटापुरतंदेखील मिळत नाही. तुम्हीच सांगा कुठून देणार पैसे?"

"अरे, रामहेत गावच्या हिश्श्याचे पैसे मी देईन, मग तर झालं! पण तुम्ही बापे जोहडचं काम तरी कराल की नाही?" दडकीमाई म्हणाली.

"अंऽऽ" नुसतीच चुळबूळ आणि हुंकार !"

"अरे आळशांनो, तिकडं गायरानात गुरं चरायला सोडायची न झाडाखाली खुशाल झोपा काढायची सवय पडलीय तुम्हाला. काम करायला काय झालं? चांगले धट्टेकट्टे आहात की, आपल्यासाठी जोहड होणार तर काम करायला नको का?"

"तू गं मुन्नी, करणार आहेस का काम? कस्तुरी तुझे हात-पाय धड आहेत ना !"[३२] वरील संवादावरून दडकीमाई उदार मताची व कर्तव्यदक्ष दिसते. गाव पाणीटंचाईपासून मुक्त

होण्यासाठी स्वत: सर्व पैसे भरायला तयार होते. विचार न करता पुढची मागची पर्वा न करता ती गावचे नेतृत्वही सांभाळण्यास समर्थ ठरते. गाव पाणी टंचाईपासून मुक्त करायचे असे तिचे स्वप्न असते.

राजेंद्रसिंहांनी केलेली मदत आदिवासी विसरत नाहीत. आपल्या सुख-दु:खाच्या प्रसंगात राजेंद्रसिंह आपल्यासमवेत असावेत असे या लोकांना वाटते राजेंद्रसिंहांना जोहड बांधण्यास प्रथम मदत करणाऱ्या कजौडीची परिस्थिती बदलते. घरात सुख-समृद्धी येते. या कजौडीच्या मुलाचे व मुलीचे लग्न होते. या शुभकार्यात राजेंद्रभैय्यांची उपस्थिती अत्यावश्यक वाटते म्हणून ती आग्रहाचे आमंत्रण द्यायला जाते. त्यांचा आशीर्वाद मिळावा म्हणून ती त्यांच्या वेळेप्रमाणे मुहूर्त काढायलाही तयार होते व म्हणते, ''भैय्या, तुम्ही शादीला आला नाही तर मी दुसरा मुहूरत काढेन...''

''बहेन, तुम्ही सांगाल तेव्हा मी येईन. केव्हा येऊ''?

...

''हा भैय्या, आदल्या दिवशी संध्याकाळी या, दुसऱ्या दिवशी सकाळची शादी झाल्यावर जेवण करून जा. बुधवारी यायचं, गुरुवारी दुपारी जायचं.''[३३] या संवादावरून असे लक्षात येते की या आदिवासी लोकांचे राजेंद्रभैय्यावरील प्रेम कमी झालेले नसते. भैय्याविषयीचा आदर कित्येक वर्षे उलटून गेली तरीदेखील टिकून राहतो.

राजेंद्रसिंहांनी अनेक जोहड परवानगी घेऊनच बांधलेले होते. जीवन समृद्ध करणारा 'लावा का बास' या जोहडचे बेकायदा बांधकाम आहे, असा आरोप केला जातो. जोहड पाडून टाका अशी नोटीस दिली जाते व राजेंद्रसिंहांवर केसही होते. या जोहडने पाणीटंचाईचा कलंक नाहीसा केला होता. तो जोहड पाडणार हे ऐकताच गावकरी पेटून उठतात. राजेंद्रसिंह या गरीब जनतेला न्याय मिळावा म्हणून 'लावा का बास' या तलावावर एकटे राहण्याचा निर्णय घेतात. न्याय मिळण्यासाठी राजेंद्रसिंह व गावकरी यांच्यात चाललेला संवाद पुढीलप्रमाणे :

''आम्ही आमचे प्राण देऊ; पण हा जोहड बांध तोडू देणार नाही. या जोहडमुळेच आम्ही जगतो आहोत. याला आम्ही हातदेखील लावू देणार नाही. कुणी त्यासाठी पुढे आले तर आमच्या प्रेतावरूनच त्यांना जावे लागेल.'

लोक घोषणा देऊ लागले. लोकांचा हा उठाव पाहून पुढची कारवाई तात्पुरती स्थगित झाली. आपल्या या ग्रामीण बंधू-भगिनींसमोर राजेंद्रसिंहांनी जाहीर प्रतिज्ञा करून पोलिसखात्याला आव्हान दिले.

याच 'लावा का बास'वर, मी त्या जोहडवर एकटाच सात दिवस राहणार आहे. इथून हलणार नाही. इथेच मला अटक करा.

...

''भैय्या, आम्ही इथे तुमच्याबरोबर राहणार, तुम्हाला एकटे सोडून आम्ही जाणार नाही. पोलिसांना आम्हालाही पकडू दे.''

ते परोपरीने विनवू लागले.

''माझी तुम्हाला विनंती आहे, मला इथं एकटं राहू दे. मी तुमचा आहे ना! माझं एवढं ऐका. मी मरणाला भीत नाही. हा संघर्ष मी एकट्यानेच लढणार आहे. तुमचे आशीर्वाद माझ्या पाठीशी असणार आहेत. मला काहीही होणार नाही. तुम्ही जा, मला एकटं राहू दे.''[३४] अशी विनंती गावकऱ्यांना करू लागले. त्यांना अटक करण्याचे धाडस कुणालाही होत नाही. या संवादावरून एका कर्तव्यदक्ष कर्मयोग्याचे दर्शन घडते.

अशाप्रकारे छोट्या छोट्या संवादाच्या वाक्यांनी ही कादंबरी आकाराला आलेली दिसते. संवादाची भाषा ही अर्थपूर्ण आहे. 'जोहड'मधील संवादामध्ये हुबेहूब चित्र उभा करण्याचे सामर्थ्य आहे. संवादातून त्या व्यक्तिच्या स्वभावातील अंतरही समजते. पात्रांच्या तोंडी असलेल्या बोलीभाषेमुळे संवाद उठावदार झाले आहेत. शिक्षित, अशिक्षित भाषा त्याचप्रमाणे राजस्थानी बोलीभाषाही काही पात्रांच्या तोंडी आली आहे. इंग्रजी, राजस्थानी काही ठिकाणी हिंदी या भाषेचा वापर संवादात गरजेनुसार येतो.

**'जोहड'ची भाषा :**

वाङ्‌मयाच्या अभिव्यक्तीचे साधन भाषा असते. कादंबरीमध्ये भाषेला स्वतंत्र स्थान असते. विचार व भावना शब्दांद्वारे व्यक्त करण्यासाठी भाषा हे प्रमुख माध्यम असते. लेखकाच्या व्यक्तित्त्वाचा, स्वभावाचा प्रभाव त्यांच्या भाषेवर पडलेला असतो. ''प्रत्येक लेखकाच्या भाषाशैलीवर देशकाल परिस्थितीचा जसा प्रभाव पडतो तद्वतच प्रत्येकाच्या शैलीवर त्याच्या व्यक्तित्त्वाच प्रभावही पडतो.''[३५] प्रत्येक लेखकाच्या लेखनाला एक विशिष्ट वळण असते ते त्या लेखनाची शैली सूचित करते. म्हणून प्रत्येक लेखकाच्या भाषाशैलीवर त्याच्या व्यक्तिमत्वाचा, भाषिक समृद्धीचा आणि संस्काराचाही प्रभाव पडत असतो. सहजसुंदरता व स्वाभाविकता हे गुण चांगल्या भाषेचे म्हणता येतील.

निवेदन व भाषा हे कादंबरीचे घटक परस्परावलंबी असतात. लेखक भाषेत नवीनता येण्यासाठी नव्याने बनवलेली रूपे भाषेत वापरताना दिसतात. शब्दांची अदलाबदल करून मोडतोड करून त्या शब्दांना नवीन अर्थ आणण्याचा प्रयत्न करतो. याविषयी भालचंद्र नेमाडे म्हणतात, ''भाषेत उपलब्ध असलेली निरनिराळ्या बोलीभाषांमधील रूपे, परक्या भाषांतून उसनी घेतलेली रूपे जुन्या काळात वापरली गेलेली, पण नंतर वापरातून नाहीशी झालेली रूपे, व्याकरणाचे नियम बाजूला सारून नव्याने वापरलेली रूपे, ह्या सर्व प्रकारांनी साहित्याच्या भाषेला नवता आणता येते.''[३६] लेखक आपल्या स्वत:च्या अनुभवातून स्वत:ची नवीन भाषा निर्माण करीत असतो.

सुरेखा शहांनी 'जोहड' या कादंबरीत स्वत:ची अशी वेगळी भाषा वापरलेली दिसते. अजाणत्या, गूढ अशा संकल्पनांचा बोध होण्यासाठी त्या प्रसंगांना समर्पक अशी भाषा वापरलेली दिसते. विशिष्ट शब्दांचा वापर, वाक्‌प्रचार, उपमा, संवाद यामुळे 'जोहड' कादंबरीची भाषा प्रभावी झाली आहे. सुरेखा शहांनी 'जोहड'मध्ये अनेक प्रश्न, संघर्ष मांडले आहेत. त्यांचे चित्रण आपल्या सहज-सोप्या भाषेत केले आहे. आवश्यकतेनुसार हिंदी, राजस्थानी, इंग्रजी शब्दांचा वापर केला आहे. अभिव्यक्तीला त्यामुळे एक स्वाभाविकता आली आहे. त्यांचे इतर लेखन स्वप्नरंजनात्मक, सोपे, सुटसुटीत, आदर्शवादी गोष्टीरूप

असे आहे. पण 'जोहड' या साहित्य कृतीत वेगळा विषय मांडला असल्याने 'जोहड'मध्ये पारंपरिक रंजनप्रधानता दिसत नाही. निवेदन, पात्र, संवाद यानुसार भाषा ही बदलली आहे.

**हिंदी, राजस्थानी, इंग्रजी भाषेचा वापर :**

सुरेखा शहांनी आशयाला सुसंगत अशी भाषा वापरून कादंबरी परिणामकारक केली आहे. 'जोहड'मध्ये मराठी बरोबरच हिंदी, राजस्थानी, इंग्रजी भाषेचाही वापर केला आहे. नेमक्या, समर्पक अर्थवाही अशा शब्दांची निवड केलेली दिसते. राजेंद्रसिंह व त्यांचे साथीदार प्रथम किशोरी या गावात जातात. तेव्हा त्या गावकऱ्यांना वाटते ही पोरं अतिरेकी असावीत. तेव्हा खुदीराम घाबरून म्हणतो, "भगवान जाने, पण तसं तर वाटत नाही." (जोहड पृ. ११) कामासाठी परगावी गेलेला कजौडीचा नवरा परत गावी येतो तेव्हा कजौडी म्हणते, "सही बात आहे." (जोहड पृ. ३५) राजेंद्रसिंह गावातील लोकांपुढे जोहड खणण्याचा प्रस्ताव मांडतात. तेव्हा तेथील वृद्ध लोक म्हणतात, "आम्ही तर निकम्मे झालोत." (जोहड पृ. ३८) राजेंद्रसिंह घरातील सर्व सामान विकतात. तेव्हा त्यांचे वडील म्हणतात, "अरे राजेंद्र, ये क्या हो रहा है !" (जोहड पृ. ४९) अशा हिंदी मराठी मिश्र भाषेचा वापर सुरेखा शहांनी केला आहे. तर काही ठिकाणी पूर्ण हिंदी वाक्याचाही वापर केलेला आढळतो. डाकू नादानसिंहाचा शत्रू असणारा मानसिंह त्याच्या भागात राजेंद्रसिंहांनी जोहड बांधल्याने डाकू नादानसिंह राजेंद्रसिंहांच्या साथीदाराना पळवून नेतो. राजेंद्रसिंह त्याच्याही भागात जोहड बांधण्याचा प्रस्ताव मांडतात. तेव्हा नादानसिंह म्हणतो, "लेकिन ये कैसे होगा?"

"जरूर होगा."

"क्यू नही..."

"मजाक मत करो, नही तो." (जोहड पृ. १४३)

राजेंद्रसिंह सुलेमानला जंगलाचे महत्त्व पटवून सांगतात. तेव्हा सुलेमानला ते पटते. तो म्हणतो, "सच है साब" (जोहड पृ. ८५) अशा पूर्ण हिंदी वाक्यांचाही वापर सुरेखा शहांनी केलेला दिसतो.

राजस्थानी बोलीभाषाही सुरेखा शहांनी 'जोहड'मध्ये वापरलेली दिसते. काही ठिकाणी शब्दांचा तर काही ठिकाणी वाक्यांचा वापर केला आहे. जंबुरीने कजौडीला हाक मारली तेव्हा घरातून बाहेर येत कजौडीने विचारले, ''तू काओ बोले कजौडी'' (जोहड पृ. ३३), राजेंद्रसिंहांवर प्राणघातक हल्ला होतो तेव्हा तेथील आदिवासी लोक म्हणतात, आपण घरी जाऊ परंतु राजेंद्रसिंह त्यांचे ऐकत नाहीत ते म्हणतात, ''नै, नै, मने काओ हुयी कोनी.'' (जोहड पृ. १०६), राजेंद्रसिंह रुढमल मीणाला काही कारणानिमित्त बोलावतात तेव्हा तो म्हणतो, ''मन बुलाओ काओ ?'' (जोहड पृ. १५९), ''पाच-सात मण दाणा शाळा की, फसलमें होवे छा, इस साल में सत्त्याहत्तर मण अनाज पैदा हुवा छै।'' (जोहड पृ. १६२) (पूर्वी पाच-सात मण शाळू व्हायचे आता सत्त्याहत्तर मण व्हायला लागलेत.) अरवरी नदीत मासे पकडण्याचा ठेका मन्नूलाल घेतो तेव्हा गावातील लोक म्हणतात, ''तू मच्छ्या क्यूं पकडे?'' (जोहड पृ. १६६) अशा प्रकारे त्या लोकांची राजस्थानी बोलीभाषा ही 'जोहड'मध्ये आली आहे. या आदिवासी व्यक्ती व त्यांची जीवनशैली या भाषेवरून चित्रित झालेली दिसून येते.

काही ठिकाणी इंग्रजी वाक्याचा व शब्दांचाही वापर केला आहे. 'ज्युनिअर ऑफिसर', 'ट्रेनिंग', 'चॅनेल्स', तरूण भारत संघाच्या कार्यावर 'मिडीया मॅन सर्व्हिस फिल्म' नावाची मालिका तयार केली आहे. 'मॅन ऑफ दी इयर' म्हणून सन्मान, 'इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स'चा पुरस्कार,'हेमिनेंट पर्सनल ॲवार्ड विजयवाडा फॉर वॉटर कांझर्वेशन' अशा अनेक परभाषेतील शब्दांचा वापर करून 'जोहड' कादंबरीची रचना सिद्ध झाली आहे.

**'जोहड' मध्ये छोट्या छोट्या वाक्यांचा वापर :**

अनेक अक्षरांचा मिळून शब्द तयार होतो. अनेक शब्दांचे मिळून वाक्य तयार होते. त्या वाक्यातून विशिष्ट अर्थ प्रकट होत असतो. असा अर्थ प्रकट करणाऱ्या वाक्यांनी 'जोहड' कादंबरी पूर्णत्वास गेलेली दिसते. छोट्या छोट्या वाक्यांमुळे आशय लक्षात येण्यास मदत होते. अशी वाक्ये पुढीलप्रमाणे, 'नवा जोहड पूर्ण झाला. उन्हाळा संपला. आषाढ आला. दोन दिवसांपासून आभाळ काळ्यासावळ्या ढगानं ओथंबलेलं. हुलकावण्या दाखवित होतं...'[३७] अशा वाक्यामुळे लेखनात दुर्बोधता येत नाही. त्याचप्रमाणे, 'ड्रायव्हरने ट्रक सुरू

केला. वनविभागाचे कार्यालय आले. तिथल्या कर्मचाऱ्यांनी ट्रक अडवला. दडकीमाई खाली उतरली...'[३८] अशा वाक्यांमुळे लेखन अर्थवाही बनले आहे. आशय वाचकास लगेच समजतो. छोटी वाक्ये सलग आल्यामुळे मनावर परिणाम होताना दिसतो.

**उपमा, म्हणी व वाक्प्रचारांचा वापर :**

उपमा, म्हणी, वाक्प्रचार यांच्या वापरामुळे लेखन प्रभावी व भारदस्त होते. या छोट्या वाक्यांत व्यक्ती, काळ, प्रसंग यांना लागू पडणारे जीवनविषयक ज्ञान प्रकट करण्याचे सामर्थ्य असते. त्यामुळे लेखनाला ठोसपणा, अर्थवाहीपणा येतो. काही वेळा नाट्यपूर्णताही येते. सुरेखा शहा खोल असणाऱ्या विहिरीला 'पाताळलोकांचाच जणू भाग' (जोहड पृ. ५) अशी उपमा देतात तर भकास, भयानक दिसणाऱ्या परिसराला 'जणू भानामतीने ग्रासलेल्या प्रदेशासारखा तो परिसर' (जोहड पृ. १३) म्हणतात. तर जयराम वाघाला पाहून शांत उभा राहतो, तेव्हा त्याला 'एखाद्या पुतळ्यासारखा' (जोहड पृ. ७१) म्हणतात. अनेक गावातील लोक जोहड बांधण्यास एकत्र येऊन सुरुवात करतात. याला सुरेखा शहा पुढील प्रमाणे उपमा देतात, 'मग मधमाशांचे थवे फुलांच्या ताटव्याकडे झेपावेत तसे गावोगावचे लोक पुढे आले.' (जोहड पृ. ३९) सूर्याला 'पतंगाची' उपमा देतात तर झुमाच्या दातांना 'खडीसाखरे सारखे' म्हणतात.

सुरेखा शहांनी उपमाप्रमाणेच म्हणींचा, वाक्प्रचारांचा वापर करून कादंबरी साकार केली आहे. त्यामुळेच मृणालिनी जोगळेकर म्हणतात, ''राजस्थानी ग्रामीण विचारसरणी, खाणंपिणं, वस्त्र, भाषेतील खास शब्द व लकब, तिथली सुख-दुःखं, समस्या यांचं इतकं हुबेहूब चित्र तिनं रेखाटलं.''[३९] हे रेखाटण्यासाठी त्यांनी ग्रामीण म्हणी, वाक्प्रचार यांचा वापर केलेला दिसतो. त्यामुळे भाषेला नेमकेपणा प्राप्त झाला आहे. उदा. 'हुलकावण्या दाखवित', 'जिवाची तगमग', 'संयमाचा बांध फुटला', 'तावातावाने बोलणे', 'मन तडफडू लागलं', 'कपाळावर आट्या पडणे', 'खरडपट्टी काढणारं', 'डंख मारणे', 'जीव व्याकूळ होणे' यासारखे अनेक वाक्प्रचार जोहडमध्ये आले आहेत.

म्हणींचाही वापर सुरेखा शहांनी योग्य ठिकाणी केलेला दिसतो. उदा. 'घर का जोगी जोगडा', 'दुजे गाव का सिद्ध', 'रातं को बैठे एकमत', 'सुबह हुवी तो सौ मत', राजेंद्रसिंह

त्यांच्या वडिलांना म्हणतात, ''सुंभ जळाला तरी पिळ जळत नाही'', वडिलांच्या स्वभावात काहीच बदल झालेला नाही, पूर्वी रागीट होते तसेच आहेत. 'एकमेकांशिवाय सत ना गत', सर्वांनी एक असावे, एकमेकांशिवाय कोणतीच कामे होऊ शकत नाहीत असे राजेंद्रभैय्यांना वाटते म्हणून सुरेखा शहांनी या म्हणींचा वापर केलेला दिसतो. गावकऱ्यांच्या कष्टाने अरवरी नदीला पुनर्जन्म मिळाला होता. या आयत्या पाण्यात ठेकेदार मासे पकडण्यास येतो तेव्हा गावकरी या 'आयत्या बिळात नागोबा' या म्हणीचा उल्लेख करतात.

अशाप्रकारे सुरेखा शहांनी 'जोहड' या चरित कादंबरीमध्ये योग्य ठिकाणी योग्य उपमांचा, वाक्प्रचारांचा व म्हणींचा वापर केलेला दिसतो. कमीत कमी शब्दांत जास्तीत जास्त आशय सांगण्याचा लेखिकेने प्रयत्न केलेला दिसतो.

**गीतांचा वापर :**

गीतामुळे लोकांचे आचार विचार कळतात. गीतामुळे प्रेरणा व प्रोत्साहन मिळते. सुरेखा शहांनी 'जोहड' या कादंबरीत अशा गीतांचा समावेश केलेला आढळतो. राजेंद्रसिंह व त्यांचे साथीदार जेव्हा समाजकार्य करण्याच्या हेतूने झपाटून जातात. तेव्हा सत्येंद्र आपल्या धीरगंभीर आवाजात गावू लागतो.

''चंद दिनकी जिंदगी है
कुछ जीना साथी
ऐसे जीले तू,
याद रखे कोई
खुदके लिये जीना
क्या जीना है भाई
कुछ करके जाये यहाँ से
गुजर जाते जाते
ऐसा कुछ करे
तेरी याद मे दुनिया रोये...
(जोहड पृ. १३)

राजेंद्रसिंहांनी गावकऱ्यांच्या साथीने जोहड बांधल्यानंतर जेव्हा पहिला पाऊस पडतो व जोहड पाण्याने भरू लागतात. तेव्हा तेथील बायका, पोरं-पोरी आनंदाने गावू-नाचू लागतात.

> ''रिमझिम रिमझिम बादली बरसेला
>
> बरसेला म्हारा देसमें,
>
> सुखी खेती हरियावेल
>
> धारासी घर भर जावेला म्हारा देसमें
>
> कारी कारी बादली बरसेला म्हारा देसमें ।। (जोहड, पृ. ३६)

कित्येक वर्षांपासून आटलेली अरवरी नदी अनेक जोहड बांधल्याने पुन्हा वाहू लागते. यावर लोकांचा विश्वासच बसत नव्हता. येथील लोक या पाण्याकडे पाहून आनंदून जात. या नदीकडे पाहून गावू लागतात...

> 'अखरी मैय्या आली,
>
> रूमझुमत, रुणझुणत
>
> सुख उधळत, लेकरांना दान देत,
>
> किनाऱ्यांना चिंब करीत
>
> दो बाजूची रुक्ष तहानलेली शेतं भिजवत,...' (जोहड पृ. १६१)

या अरवरी नदीच्या आगमनाने हे लोक 'आपण आता समृद्ध जीवन जगू' या आनंदाने सुखवून जातात.

कजौडीच्या लेकीचे व लेकाचे लग्न एकाच मांडवात होते. या मंगलप्रसंगी तेथील बायका सर्व काम सोडून या कार्यक्रमात सहभागी होतात व गावू लागतात,

> ''उड उड रे, उड उड रे मारा काला रे कागरा
>
> जद मारा पिवजी घर आयो...'' (जोहड पृ. १८७)

विवाहाच्या प्रसंगी आनंद वाढविण्यासाठी हे नाचगाणे आवश्यक असते. रोजचे चाकोरीबद्ध जीवन विसरून काही काळ त्या मुक्त जीवन जगताना दिसतात.

राजेंद्रसिंहांच्यावरही या आदिवासी लोकांनी गाणे रचले होते. या जोहडवाल्या बाबाविषयी आदिवासी लोकांच्या मनात स्नेह, आदर, प्रेम आहे हे या गाण्यावरून लक्षात येते.

'जे जोडवालोने करामतवालोने
रहमत वालोने, बडे दिलवालोने
नयी दुनिया बनायी है
बहारे रंग लायी है
ये पहिले मुस्कुरायी है...'' (जोहड पृ. १९२)

अशाप्रकारे सुरेखा शहांनी अनेक गीतांचा वापर कादंबरीमध्ये केलेला दिसून येतो. अनेक गीतांची योजना हे त्यांच्या कादंबरीचे वेगळेपण म्हणता येते.

**लोककथांचा वापर :**

सुरेखा शहा यांनी आपल्या कादंबरीमध्ये काही लोककथांचा वापर केलेला दिसतो. या लोककथांमुळे आशयाला बळकटी आली आहे. त्यामुळे आशयाची परिणामकारकता वाढली आहे. नवीन माहितीही त्यामुळे माहित होते.

अनेक वर्षांपासून काही परंपरा चालत आलेल्या दिसतात. त्याचे महत्त्व आजही कमी झालेले नाही. या परंपरेमागचा हेतू म्हणजे जंगलाचे संरक्षण व्हावे. काकडबनी, रखतबनी, देवारण्य, वाल, देवबनी हे जंगलाचे प्रकार ठरवून त्या प्रत्येकाला नियम होते. 'काकडबनी' म्हणजे दोन गावांच्यामध्ये जंगल निर्माण करायचे व देवदेवतांची मंदिरे बनवायची. 'रखतबनी' यात हे जंगल गावकरी तयार करत व या वनस्पतींच्या पानांचा देखील वापर करत नसत. दुष्काळातच सर्वांच्या विचाराने वापर केला जाई. 'वाल' यामध्ये दानशूर व्यक्ती जमीनी दान देत. ती जमीन गायी गुरांना चरण्यासाठी राखून ठेवायची. तेथे शेती केली जात नसे. 'देवारण्य' म्हणजे देवदेवतांच्या नावाने काही जमीन ठेवायची. गंगाजल आणि दूध मिसळून सीमा ठरवून चारी बाजूने टाकायचे व त्या जमिनीत वृक्षांची लागवड करायची. 'देवबनी' यात एखादा सिद्धपुरुष अथवा योगी समाधी घ्यायचा. तेथील वृक्षतोड कुणीही

करत नसे. अशा प्रकारच्या परंपरेमुळेच जंगलाचे संरक्षण होते. अजूनही ही प्रथा अस्तित्वात आहे. याच्या पाठीमागचे कारण म्हणजे लोकांची श्रद्धायुक्त परंपरा म्हणता येईल.

राजेंद्रसिंह धराडीचे संमेलन भरवतात. त्यामुळे वृक्षाचे संरक्षण गावकरी करू शकतील व सर्वांना वृक्षांचे महत्त्व समजेल, असे त्यांना वाटत होते. धराडी म्हणजे 'प्रत्येक घराण्याचं म्हणून एक वृक्षदैवत असतं आणि त्या घराण्यातील लोक तो वृक्ष कधीही तोडत नाहीत. त्याचे लाकूड वापरीत नाहीत. त्याची पूजा करतात.'[४०] अशी तेथील लोककथा आहेत. याचा फायदा घेऊन पर्यावरण रक्षण करावयास हवे असे ते ठरवतात. संमेलनाचे आयोजन करतात. सर्व गावकरी एकत्र येऊन प्रत्येकजण आपल्या घराण्याचे वृक्षदैवत सांगतात व त्या पाठीमागील कथाही सांगतात. कुणी वड धराडीची कथा सांगतात तर कुणी कदंब, बेलपत्र, खेजडी, पिंपळ, अशोक अशाप्रकारे आपल्या वृक्षदैवत असणाऱ्या धराडी वृक्षांची नावे सांगतात. राजेंद्रसिंह सिसोदिया धराडी असल्याचे सांगतात. अशाप्रकारे राजेंद्रसिंह सर्वांना वृक्षाची माहिती सांगून सर्वच वृक्ष आपले धराडी असे मानावेत असे सांगतात. या धराडीच्या लोककथा 'जोहड' कादंबरीला कलात्मक पातळीवर नेतात. कादंबरी सकस बनत जाते.

**समारोप :**

सुरेखा शहा यांनी तृतीयपुरुषी निवेदनाचा वापर करून 'जोहड' ही कादंबरी साकार केल्याचे दिसून येते. त्यांनी अर्थपूर्ण प्रत्ययकारी अशा शब्दांचा वापर करून प्रभावी निवेदन केलेले दिसून येते. राजस्थानमधील आदिवासी लोकांच्या जीवनाचे प्रत्ययकारी चित्रण केले आहे. पात्रांच्या अंतरंगात प्रवेश करून त्यांच्या भाव-भावना, आचार-विचार व्यवस्थितरीत्या मांडलेल्या दिसतात. कादंबरीत दुष्काळी वातावरणाचे चित्रण येते. राजस्थानमधील आदिवासी लोकांचे दुःख, दारिद्र्य, दैन्य, आजूबाजूचा परिसर हे 'जोहड'मधील वातावरणातून पहावयास मिळते.

सुरेखा शहांनी 'जोहड'मध्ये काही ठिकाणी भूतकाळाचा वेध घेऊन वर्तमानकाळ रेखाटलेला दिसतो. या कादंबरीत प्रसंग हे एकमेकांशी निगडित असल्याचे दिसून येतात. वाचकांचे लक्ष प्रसंगाकडे खेचले गेल्यामुळे कादंबरीची परिणामकारकता वाढलेली दिसते.

प्रसंगामुळे वाचकांच्या मनात कुतूहल निर्माण होते. सुरेखा शहांनी स्वभावानुरूप, वयपरत्वे, लिंगानुसार संवाद लिहिले आहेत. विशिष्ट परिस्थितीचा, घटनेचा, व्यक्तींचा विचार करून संवाद प्रकट केलेले दिसतात. यातून त्यांच्या ठिकाणी भाषेची उत्तम जाण असल्याचे दिसून येते. हिंदी, इंग्रजी, राजस्थानी भाषेचा आवश्यक ठिकाणी वापर केलेला पहावयास मिळतो. भाषा पात्रानुसार बदललेली दिसते. सर्वसामान्य माणसाला या कादंबरीचे आकलन व्हावे अशा भाषेचा वापर केला आहे.

कादंबरीला वास्तवाचा भक्कम आधार लाभल्याने परिवर्तनवादी चळवळीचा आलेख ठोस शब्दात मांडलेला दिसतो. ही कादंबरी छोट्या-छोट्या वाक्यांनी आकाराला आलेली दिसते. योग्य ठिकाणी योग्य उपमांचा, म्हणींचा, वाक्प्रचारांचा, गीतांचा वापर केलेला दिसतो. ही कादंबरी वाचकाला विचार करण्यास प्रवृत्त करते. समर्पक अशा शब्द योजनेमुळे ही कादंबरी वाचकांच्या मनावर बिंबते. सुरेखा शहांनी राजेंद्रसिंहांचे कार्य व भोवतालचा परिसर या दोन्ही वास्तव घटकांचा जो संबंध निर्माण झाला तो अर्थपूर्ण व परिणामकारक अशा भाषेत मांडलेला आहे. लेखिकेचे चिंतन, अनुभव, कल्पनाशक्ती, सौंदर्यदृष्टी, व्यासंग, विचार हे 'जोहड'च्या रचनेतून प्रत्ययाला येतात.

## संदर्भ


| | | | |
|---|---|---|---|
| १ | फडकुले निर्मलकुमार | : | 'दै.सकाळ', सोलापूर, मंगळवार, १८ जून २००२, पृ. ६ |
| २ | सुनीता | : | 'धुनी व्यक्तित्वों की जिद्दी रेखाएँ', समकालीन भारतीय साहित्य : साहित्य अकादेमी की द्विमासिक पत्रिका, सितंबर-अक्तूबर, २००३, पृ. १६१ |
| ३ | दीक्षित अनंत | : | 'दै. सकाळ', सोलापूर, मंगळवार, १२ जून २००२, पृ. ६ |
| ४ | शहा विद्युलता | : | उनि, पृ. ६ |
| ५ | शहा सुरेखा | : | 'दै. सकाळ', सोलापूर, सोमवार, २५ ऑक्टोंबर २००४. |
| ६ | गणोरकर प्रभा व इतर | : | संपा. 'वाङ्मयीन संज्ञा-संकल्पना कोश', ग. रा. भटकळ फाऊण्डेशन प्रकाशन, मुंबई, प्र.आ. डिसेंबर २००१, पृ. १७७ |
| ७ | शहा सुरेखा | : | 'जोहड', समेरू प्रकाशन, डोंबिवली, तृ. आ. डिसेंबर २००३, पृ. ३२ |
| ८ | तत्रैव | : | पृ. ९४ |
| ९ | तत्रैव | : | पृ. ९४ |
| १० | तत्रैव | : | पृ. १०३ |
| ११ | तत्रैव | : | पृ. १०३ |
| १२ | तत्रैव | : | पृ. ४५ |
| १३ | तत्रैव | : | पृ. ६२ |
| १४ | तत्रैव | : | पृ. ८२ |
| १५ | घारे दीपक | : | 'ललित', मानाचे पान, मुंबई, मार्च २००३, पृ. ३७ |

| | | | |
|---|---|---|---|
| १६ | बापट प्र. वा. व गोडबोले ना. वा. | : | 'मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास', व्हिनस प्रकाशन, पुणे, तृ.आ. सप्टेंबर १९७३, पृ. १२९, १३० |
| १७ | शहा सुरेखा | : | उनि. पृ. १८ |
| १८ | तत्रैव | : | पृ. ११ |
| १९ | तत्रैव | : | पृ. १३ |
| २० | तत्रैव | : | पृ. २५ |
| २१ | तत्रैव | : | पृ. १४१ |
| २२ | बापट प्र. वा. व गोडबोले ना. वा. | : | उनि. पृ. ८६ |
| २३ | तत्रैव | : | पृ. ८८, ८९ |
| २४ | शहा सुरेखा | : | 'दै. लोकमत', बातचीत, प्रमोद पाटील |
| २५ | शहा सुरेखा | : | उनि, पृ. ६१, ६२ |
| २६ | तत्रैव | : | पृ. ६३ |
| २७ | तत्रैव | : | पृ. १०९ |
| २८ | तत्रैव | : | पृ. १०६ |
| २९ | तत्रैव | : | पृ. ७१ |
| ३० | तत्रैव | : | पृ. ३३ |
| ३१ | तत्रैव | : | पृ. १९, २० |
| ३२ | तत्रैव | : | पृ. ५५ |
| ३३ | तत्रैव | : | पृ. १९१ |
| ३४ | तत्रैव | : | पृ. २११ |
| ३५ | बापट प्र. वा. व गोडबोले ना. वा. | : | उनि. पृ. १३७ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३६ | नेमाडे भालचंद्र | : | 'साहित्याची भाषा', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, द्वि. आ. १९९८, पृ. १७ |
| ३७ | शहा सुरेखा | : | उनि. पृ. ३५ |
| ३८ | तत्रैव | : | पृ. ५७ |
| ३९ | जोगळेकर मृणालिनी | : | 'दै. सकाळ', मधुरा-पुणे, शनिवार, १२ ऑक्टोबर, २००२, पृ. ८ |
| ४० | शहा सुरेखा | : | उनि. पृ. १३२ |